Review Of Research
ISSN 2249-894X

Impact Factor : 3.1402(UIF)
Volume - 4 | Issue - 10 | July – 2015

# लोकसाहित्य आणि आधुनिक मराठी साहित्य

डॉ. माधव बसवंते

*सारांश :*

लोकसाहित्य हे परंपरागत असले तरी त्यात चैतन्यशीलता आणि गतिमानता असते. समकालीन जीवन व्यवहाराचे प्रतिबिंब लोकसाहित्यात असते, म्हणूनच मानवी संस्कृतीच या लोकसाहित्यातून प्रकट होत असते. संत एकनाथाच्या भारुडांमधील विषयांची विविधता ही लोकजीवनाशी समरसता दर्शविणारी आहे. आधुनिक मराठीच्या काव्यांची मूळे ही लोकसाहित्यात दिसून येतात. म्हणूनच मराठी कवितेवर लोकगीतांमधील आशयसूत्रे, रचनाबंध, प्रतिमाबंध व जीवनदृष्टी यासारख्या अनेक घटकांचा प्रभाव जाणवतो. लोकजीवनाची विविध अंगे, भावभावना, अपेक्षा, कल्पना यांचे प्रतिबिंब लोककथेत दिसून येते. लोकरंगभूमी व आधुनिक रंगभूमी यांचे नाते आजही कायमच राहिले आहे. सामूहिकता आणि श्रद्धाभावांच्या तत्वाने लोक कलाविष्कार प्रकट होत असतात. म्हणूनच लोककलाविष्कार हे मौखिक परंपरेने चालत आलेली लोकसाहित्याची अंगे आहेत.

**बीजसंज्ञा** : लोसाहित्य, लोकगीत आणि आधुनिक कविता, लोककथा आणि आधुनिक कथा, लोकनाट्य आणि आधुनिक रंगभूमी, लोककला आणि आधुनिक कलाविष्कार.

## प्रस्तावना

लोकसाहित्य हे परंपरेचा एक भाग असून समकालीन जीवनव्यवहाराशी या लोकसाहित्याचे संवादपूर्ण नाते असते. सत्य, अहिंसा, बंधुभाव, प्रेम, सहानुभूती ही आपल्या भारतीय संस्कृतीची चिरंतर मूल्य आहेत. लोकसाहित्य हे या चिरंतर मूल्यांचे दर्शन आपल्या विविध आविष्कारातून देत असते. आधुनिक कविता, कथा, रंगभूमी आणि कलाविष्कार यावर लोकसाहित्याचा सर्वसामान्यपणे प्रभाव जाणवतो. लोकसाहित्य या शब्दातील 'साहित्य' हे केवळ 'ललित वाङ्मय' या शब्दांपुरता त्याचा आशय नसून या लोकसाहित्यात प्रामुख्याने प्रथा, परंपरा, मूल्य, आचार-विचार, जीवनव्यवहार, धार्मिक संस्कार अशा अनेक मौखिक कलाविष्कारांचे दर्शन होते. म्हणूनच लोकसाहित्याची व्याप्ती ही सर्वसमावेशक आहे. अंतिमतः लोकसाहित्याच्या परंपरेतूनच आधुनिक मराठी साहित्याला समृद्धीची नवी दिशा मिळाली यात कोणताही संदेह नाही.

व्यापक व सर्वसमावेशक स्वरूपाची आहे. आरोग्याची संकल्पना आणि व्याख्येवरून असे स्पष्ट होते की, शारीरिक, मानसिक आणि सामाजिक आरोग्य या बाबी व्यक्तिजीवनाचा भाग आहेत.

## लोकसाहित्य म्हणजे काय ?

लोकसाहित्य हे लोकांचे असते. लोक साहित्यातून लोकसंस्कृतीचे दर्शन होत असते. लोक आणि साहित्य या दोन पदांचा संयोग होऊन लोकसाहित्य हा शब्द निर्माण झाला आहे. लोकसाहित्य या मराठी शब्दांसाठी विलियम थॉम्स यांनी सन १८४६ मध्ये इंग्रजी भाषेत Folklore हा शब्द वापरला आहे. सन १९१६ पासूनच लोकसाहित्याच्या प्राणप्रतिष्ठेला प्रारंभ झाल्याचे दिसून येते. लोकसाहित्य या शब्दासाठी द.वा. पोतदार यांनी 'लोकविद्या', डॉ. सुनीतिकुमार चटर्जी यांनी 'लोकयान', डॉ. कृष्णदेव उपाध्याय यांनी 'लोकसंस्कृती', डॉ. वासुदेवशरण अग्रवाल यांनी 'लोकवार्ता', हे शब्द वापरले आहे. पण मराठी साहित्य विश्वात लोकसाहित्य या शब्दाचाच वापर होत आहे.

लोकसाहित्य हे लोकांच्या संस्कृतीचा एक घटक असून ते लोक समूहाच्या जीवनाच्या आविष्काराचे शास्त्र आहे. प्राचीन समाज जीवनाचे अवशेष लोकसाहित्यात असते. लोकसाहित्य हे एका पिढीपासून दुसऱ्या पिढीकडे मार्गक्रमण करीत असले, तरी त्याचा निर्माता मात्र अज्ञात असतो. म्हणूनच लोकसाहित्य हे सर्व परंपरागत कला व वाङ्मयाचे प्रमुख स्त्रोत मानावे लागते.

## लोकगीत आणि आधुनिक कविता

भारतात लोकगीतांची परंपरा ही आदिम काळापासून चालत आलेली आहे. वेद, पुराणे, यासारख्या प्राचीन ग्रंथामध्ये लोकगीताचे अनेक उल्लेख दिसून येतात. लोकसमूहाची कल्पना आणि त्यांच्या विविध प्रज्ञेचा आविष्कार लोकगीतातून होत

असतो. प्रत्येक पिढीच्या जीवन चेतना लोकगीतातून आविष्कृत होत असतात.

मराठी कवितेला सातशे-आठशे वर्षाची समृद्ध परंपरा असून संत साहित्य हे या कवितेचे प्रारंभीचे उन्मेष म्हणावे लागते. प्रारंभीची मराठी संत कविता आध्यात्मिक आशय प्रकट करते. संताच्या कवितांतून प्रकट होणारे दृष्टांत, रुपके, अलंकार, नाद यांचे लोकगीतांशी निकटचे नाते आहे. लोकसाहित्यकार आणि लोकशिक्षक या दोन्ही भूमिका समर्थपणे वठविणारा संत एकनाथाशिवाय अन्य कोणताही कवी मध्ययुगीन मराठी साहित्यात आढळत नाही, असे मत डॉ. वसंत जोशी यांनी व्यक्त केले. चित्रपट, आकाशवाणी, दूरदर्शन यासारख्या अनेक माध्यमांसाठी रचलेली भावगीते व इतर चित्रपटगीते ही प्रामुख्याने लोकगीतांच्या रचनावर आधारलेली असल्याचे दिसून येते. 'संतांनी आपल्या आविष्कारासाठी वापरलेले ओवी आणि अभंग हे खास लोकजीवनातील अतिप्राचीन मराठी छंद आहेत. मराठी संतांनी हा गद्यप्राय, लवचीक, लोकछंद सुप्रतिष्ठीत केला. लोकजीवनातील हा छंद स्त्रियांच्या गीतरचनेचा छंद ! म्हणजे आजच्या भाषेत अगदी तळागाळातील घटकाचा हा पारंपरिक सहज छंद संतानी आपल्या आविष्कारासाठी वापरला आणि केवळ लोकोद्धाराचाच मार्ग दाखवला असे नव्हे, तर लोकछंदापासून लोकजीवनातून अनेक अंगांना प्रतिष्ठा प्राप्त करुन दिली, अनेक अंगांचे उन्नयन केले.'[१] कवी बा.सी. मर्ढेकर यांनी ओवी, अभंग या लोकछंदाचे आपल्या कवितेतून उपयोजन केले. त्याचबरोबर बहिणाबाई चौधरी, कुसुमाग्रज, विंदा करंदीकर, मधुकर केचे, फ.मु. शिंदे, बा.भ. बोरकर, ना.धो. महानोर, ना.घ. देशपांडे, इंदिरा संत, इंद्रजित भालेराव, विठ्ठल वाघ, अण्णा भाऊ साठे, नारायण सुर्वे, दया पवार, वसंत बापट यासारख्या अनेक कवींनी आपल्या साहित्य लेखनात लोकछंदाचा वापर केला आहे. कवी बा.भ. बोरकर यांच्या कवितेतील नादसौंदर्याचा लय हा लोकसंगीताचा प्रभाव आहे. कवींच्या एकूणच जीवनदृष्टीवर आदिम व सनातन लोकतत्वांचा परिणाम होत असतो. म्हणूनच लोकगीतांची दीर्घ परंपरा ही मराठी कवितेला प्रभावित करीत असते. लोकगीत आणि आधुनिक मराठी कविता यातील प्रेमानुभावही स्पष्टपणे जाणवतो.

## लोककथा आणि आधुनिक कथा

माणसांचे जग हे कथाप्रिय जग म्हणावे लागते. आपण अगदी प्राचीन काळापासून अनेक कथा ऐकणे व सांगत आलो आहोत. मौखिक परंपरेने चालत आलेला हा कथाप्रकार असून यातून लोकांच्या भावभावना, अपेक्षा, कल्पना यांची अभिव्यक्ती या लोककथेतून झाल्याचे दिसून येते. लोककथा ही आदिम काळापासून मौखिक परंपरेने चालत आलेली ही एक लोकसाहित्यकृती आहे. म्हणूनच आधुनिक कथेचा उगम लोककथांमधून झाला आहे. लोककथांचा भर हा अद्‌भुतरम्यतेवर अधिक होता, पण आधुनिक कथा ही वास्तवावर अधिक भर देतांना दिसून येते. लोककथांची संहिता ही प्रामुख्याने खुल्या स्वरुपात होती, तर आधुनिक कथेची संहिता ही बंदिस्त झालेली आहे. सामान्यपणे आधुनिक कथांवर आशयसूत्रे, रचनाबंध, प्रतिमा-प्रतिके, मिथके यांच्यावर लोककथांचा प्रभाव जाणवतो. लोककथा व आधुनिक कथा यात भेद व परिणामाचे वेगळेपण असले तरी 'कथन' हे त्यांचे मूळसूत्र व गाभा आहे. आधुनिक कथेतून जीवनदर्शनाची विविध विविधांगी रुपांचे दर्शन होते. व्यंकटेश माडगूळकर, जी.ए. कुलकर्णी, गौरी देशपांडे, वि.स. खांडेकर, कमल देसाई, गो.नी. दांडेकर, यासारख्या अनेक लेखकांवर लोककथांतील विविध आकृतीबंधाचा प्रभाव दिसून येतो.

## लोकनाट्य आणि आधुनिक रंगभूमी

भारतातील सिंधू संस्कृती, इतिहासपूर्व काल, वेद, ब्राम्हणग्रंथ, महाभारत, रामायण यासारख्या अनेक प्राचीन ग्रंथात नाट्य परंपरेचे उल्लेख दिसून येतात. लोकसमूह मनाचा आविष्कार करणारी नाट्यकला ही नृत्यकलेतून जन्माला आल्याचे अनेक विचारवंत मानतात. मानववंशशास्त्रज्ञांनी विधी हीच नाट्याची गंगोत्री मानतात. विधीनाट्यातून लोकनाट्याचा प्रवास सुरु झाल्याचे दिसून येते. मराठी रंगभूमीचा प्रवास हा विधीनाट्यातून लोकनाट्य व पुढे आधुनिक नाटकांकडे झाल्याचे जाणवते. विष्णुदास भावे यांनी सन १८४३ मध्ये मराठी रंगभूमीची मुहूर्तमेढ रोवल्याचे मान्य केले जाते. त्यानंतर सन १८६१ मधील विनायक जनार्धन कीर्तने यांच्या 'थोरले माधवराव पेशवे' या नाटकापासून मराठी नाट्यवाङ्मयाचा उदय मानला जातो. आशयसूत्रे, लोकतत्त्वे, लोकभाषा, अभिनय शैली, संगीत, सादरीकरण, प्रेक्षक अशा लोकनाट्याचा आशयात्मक व आविष्कारात्मक प्रभाव आधुनिक रंगभूमीवर पडल्याचे दिसून येते. लोकनाट्य ही मिथकांचा आश्रय घेतली असून आधुनिक रंगभूमीनेही मिथकाचे उपयोजन केले आहे.

गो.पु. देशपांडे यांच्या मतानुसार आधुनिक मराठी नाटकाचा जन्म ही राजकीय घटना आहे. लोकरंगभूमी आणि आधुनिक रंगभूमी यांची स्वतंत्र बलस्थाने व व्यवच्छेदक लक्षणे असतात. दलित रंगभूमीवरील प्राचार्य म.भि. चिटणीस यांचे 'युगयात्रा' हे एक प्रभावशाली व लक्षणीय नाटक ठरले आहे. आधुनिक रंगभूमीवरील अनेक नाटकांपुढे समाज प्रबोधनाचा आविष्कार अधिक गतिशील झाला.

## लोककला आणि आधुनिक कलाविष्कार

लोक कलाविष्कार हे मौखिक परपंरेने चालत असलेल्या लोकसाहित्याची अंगे आहेत. कलाविष्कार हा मानवी भाव भावनांचा सौंदर्यात्मक अविष्कार आहे. चित्र, संगीत, नृत्य, वास्तू यासारख्या अनेक माध्यमातून या कलांचा आविष्कार होत असतो. या आधुनिक कलाविष्कारांची बीजे ही लोककलांमध्ये प्रामुख्याने दिसून येतात. चित्रकलेचा आविष्कार हा प्रामुख्याने आनंद, मनोरंजन, श्रद्धा, उत्सव, सौंदर्य अशा अनेक प्रेरणेतून झ ााला आहे. राजकीय आश्रयाने ही कला बहरत असते. लोकचित्रकलेतील प्रेरणा, आशयसूत्रे, रेखाटन तंत्र, रंगद्रव्य यांचा

प्रभाव अंशात्मक स्वरुपाचा का असेना, तो प्रभाव आधुनिक चित्रकलेवर पडल्याचे दिसून येते.

संगीत ही श्राव्य कला आहे. लोकगीत, लोकवाद्ये व कंठसंगीत यांच्या एकत्रित आविष्कारातून लोकसंगीत ही संकल्पना पुढे आली. अशोक रानडे यांनी लोकसंगीताचे आदिम संगीत, नागर संगीत, लौकिक संगीत असे तीन प्रकार मानले आहेत.

नृत्य ही देहाच्या विविध प्रकाराच्या हालचालीतून केली जाणारी ही प्रायोगिक कला आहे. भरत्नाट्यम कथक, कथकली, कुचिपुडी, मणिपुरी, मोहिनीआट्टम, ओडिसी इ. ही भारतीय नृत्यशैलीचे काही प्रकार आहेत. धर्मकथा, धार्मिक सण-उत्सव, रंजन, उद्बोधन, सामूहिकता, परंपरा, श्रमपरिहार, जीवन, संघर्ष, निसर्ग ही सामान्यपणे लोकनृत्याची वैशिष्ट्ये आहेत. भक्ती भावना, सुरक्षितता, सौंदर्यभावना यासारख्या माणसांच्या भावनिक आविष्कारातून वास्तुकला व शिल्पकला अस्तित्वात आल्या आहेत. कालिक परिवर्तनातही शिल्पकला वास्तुकला यात लोक सामूहिक जीवनदृष्टीची तत्त्वे ठळकपणे जाणवत असतात.

## निष्कर्ष

- लोकगीते ही मराठी कवितेची पूर्वरुपे असून आशयसूत्रे, रचनाबंध, प्रतिमाबंध, जीवनसृष्टी यांचा प्रभाव आधुनिक कवितेवर स्पष्टपणे जाणवतो. म्हणूनच मराठी कवितेची मूळे ही लोकगीतात आढळतात.
- लोककथा ही प्रामुख्याने मौखिक परंपरेचा आश्रय घेत चालत आलेली असून, तिचा संबंध हा आदिम अनुभूती प्रकट करण्याशी असतो. तर आधुनिक कथा ही मानवी जीवनातील माणसांचे गुंतागुंतीचे अनुभव, जीवन संघर्ष, वृत्ती-प्रवृत्ती, संस्कार, यासारख्या स्वरुपाचे कथन असते.
- लोकनाट्यातील पौराणिक आशय, विधी, धार्मिक मिथक, उद्बोधनाची प्रेरणा व रंजनपरता, आकलनसुलभ आशय व सादरीकरणातील सोपेपणा, प्रेक्षक व सादरकर्ते यांच्यातील सुसंवाद, नर्तन, गायन, वादन, वेशभूषा, रंगभूषा, लोकद्रव्यनिर्मित रंगमंच या अनेक गोष्टींचा प्रभाव आधुनिक रंगभूमीवर पडल्याचे स्पष्टपणे जाणवते.
- चित्रकला ही दृकप्रत्ययीकला असून त्यातील लोकतत्त्वे ही समूहमनांना आकर्षित करीत असतात. लोकांच्या मनातील श्रद्धाभाव हा लोकसंगीताचा मुख्य आशय आहे. लोकसंगीत व आधुनिक संगीत यामध्ये वादन, गायनपद्धती, सादरीकरण यांच्यात सातत्याने देवाणघेवाण होत असून आधुनिक संगीत समृद्ध होण्यास लोकसंगीताचे योगदान श्रेष्ठच असल्याचे मान्य करावे लागते.
- आदिवासी नृत्य ही भारतीय लोकनृत्याचा पाया समजली जातात. तर वास्तुकला व शिल्पकलामध्ये सामाजिकता, सौंदर्य जाणीव, लौकिक जाणीव ही तीव्र स्वरुपात जाणवत असते.

## संदर्भ ग्रंथ


१.डॉ. भवाळकर तारा, लोकसंचित, राजहंस प्रकाशन, पुणे.

२.रानडे अशोक, लोकसंगीतशास्त्र, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ.

३.डॉ. पगार एकनाथ, लोकसाहित्य व आधुनिक साहित्य, यचममुवि, नाशिक.

४.देशपांडे ना.घ, शीळ, मौज प्रकाशन.

५.डॉ. फडके भालचंद्र, दलित रंगभूमी.




**डॉ. माधव बसवंते**